International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# *नव महाराष्ट्रातील नव सतांत्तरे*

प्रा.कोकरे संतोष संजय
मुधोजी कॉलेज,फलटण
*Corresponding Author* - प्रा.कोकरे संतोष संजय
**Email-** kokaresantosh1994@gmail.com

**गोषवारा**

जगामध्ये अनेक सतांत्तरची बंडे झाली तशी ती भारतात देखील त्याप्रमाणे ती महाष्ट्रात देखील झाली. महारष्ट्र देखील त्याला उपवाद नाही. महाष्ट्रात झालेल्या सतांत्तर बंडा विषयी माझे मुलभूत विचार मांडण्याचे प्रयत्न मी या शोध निबंधतून करणार आहे. याविषयी ऐतहासिक ,वर्णात्मक समीक्षा पद्धतीचा वापर करणार आहे. अगदी पाह्युला गेले तर संयुक्त महारष्ट्र स्थापनेपासूनच कॉंग्रेसचा बालेकिल्ला महारष्ट्र राहिला आहे . त्यामुळे बऱ्याच काळ कॉंग्रेस सत्ता महाष्ट्रावर राहिली आहे. कॉंग्रेसचे प्रथम व महाराष्ट्राचे देखील प्रथम मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ते २०१४ सालच्या आघाडी सरकार पर्यंत भाजप सेना युती काळ १९९५- १९९९ वगळता. १९६७ साली देशात अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या नंतर कॉंग्रेस खिळखिळी झाल्या नंतर १९६९ साली कॉंग्रेस मध्ये पहिली फुट पडली. पण कॉंग्रेस चा प्रभाव कायम राहिला आणीबाणीत कॉंग्रेस सरकार स्थिर राहिले. आणीबाणी नंतर देशातील सत्ता जाऊन देशात जनता सरकार आले . १९७८ साली कॉंग्रेस मध्ये दुसरी फुट पडली व महाष्ट्रात पहिले बिगर कॉंग्रेस सरकार स्थापन झाले त्याला पुरोगामी लोकशाही आगदी नाव देण्यात आले या सरकारचा नेता होता सर्वांत तरुण चेहरा वय ३८ वर्ष नाव शरद गोविंदराव पवार . शरद पवारांनी अचानक सत्ते तून बाहेर पडून बिगर कॉंग्रेसी सरकार स्थापन करण्याच कारण काय बर असाव....?

याला कारण होत १९७२ पासून कॉंग्रेसमधील अंतर्गत कलह त्यामुळ महाराष्ट्र कॉंग्रेस मध्ये पडलेले दोन गट,तस पाहिलं तर महाराष्ट्रच्या राजकीय चौकटच्या भवितव्याच्या दृष्टीने एक ऐतहासिक टप्पा होता. यशवंतराव चव्हाण यांनी १९६० उभारलेल्या राजकीय डोलारयावर इंदिरा गांधींची वक्र दृष्टी आहे ,याचे भान यशवंतराव यांचा शिष्य शरद पवार जाणत होते. म्हणून त्यांनी थोड्याच काळात संयुक्त मंत्रीमंडळा सुरुंग लावून 18 आमदारासह समाजवादी कॉंग्रेस नावाने आपला स्वतंत्र प्रादेशिक गट स्थपन करून बिगर कॉंग्रेस पक्षांचे नेतृत्व स्वत: कडे घेतले. अशा रीतीने महाराष्ट्रात पहिले सतांत्तर घडून जुलै १९७८ शरद पवार मुख्यमंत्री झाले. पण ते जास्त काळ सत्तेवर राहू शकले नाहीत. याच काळात जनता पक्षातील फाटाफुटीमुळे प्रथम मोराजी देसाई नंतर चरणसिंग सरकार अल्पमतात गेली आणि जानेवारी १९८० मध्ये लोकसभा निवडणूक पुन्हा घ्यावी लागली .यामध्ये इंदिराजीनचा विजय झाला त्या पंतप्रधान झाल्या अशावेळी वसंतराव व यशवंतराव पुन्हा इंदिरा कॉंग्रेस मध्ये गेले मात्र पवार स्वतंत्र राहिले . सत्तेवर येताच इंदिराजींनी ९ बिगर कॉंग्रेस राज्य बरखास्त केली आणि राष्ट्रपती राजवट लावली. आणि पवारानच, सरकार कोसळले .पुढे महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका घेण्यात आल्या यामध्ये कॉंग्रेस आय ला १८६ जागा मिळाल्या तर पवारांच्या कॉंग्रेस एस ने ४७ जागा मिळवल्या . इंदिरा कॉंग्रेस मध्ये तिकीट वाटपात मोलची भूमिका बजावणारे अंतुले मुख्यमंत्री बनले ते महाराष्ट्राचे प्रथम मुस्लीम मुख्यमंत्री होते. अश्या रीतीने हे मोठे सतांत्तर होते. पण पुढे मराठा

नेतृत्व संघर्ष व सिमेंट वाटप प्रकरण आणि इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठान निधी यांचे निमित होऊन अंतुले गेले .व बाबासाहेब भोसले नवीन मुख्यमंत्री झाले . इंदिराजिना सत्ता आपल्या हातात हवी होती त्यासाठी त्यांनी कमी आमदार पाठींबा असलेला नेता निवडला होता. वसंतदादा गटची खूप मानहानी झाली होती तरी देखील ते शरद पवारांशी जुळवून घ्याला तयार नव्हते . त्यामुळ महारष्ट्र कॉंग्रेस खिळखिळी झाली ग्रामीण भागतील कार्यकर्त्यांचे जाळे विनून पक्ष उभारून सत्ता स्थपन करण्याची कार्यपद्धती बाजूला पडली व केंद्रीय नेत्याकड वशिला लावून आपल्या पदरात मंत्री पद आमदारकी महामंडळ खाती आपल्या पदरात पाडून घेण्याची लगीनघाई सुरु झाली १९८० साला पासून जनहितभीमुख राजकारण बाजूला पडून स्व:हित राजकारण चा पायंडा पडला. पण

वर्षभरात बाबासाहेब भोसले पायउतार झाले.(फेबुवारी१९८३) आणि वसंतदादा पुन्हा मुख्यमंत्री झाले. पण १९७५ ते १९८२ या काळातील पडझडीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात मराठा नेतृत्वाकडून या काळात त्यांना पुरेसे स्वातंत्र्य मिळणे शक्य नव्हते. १९८५ साली इंदिरा गांधी हत्येनंतर त्याचा अनुभव कॉंग्रेसला आला राजीव गांधी नवखे नेतृत्व असून देखील कॉंग्रेसला १९८० पेक्ष्या २४ जागा कमी मिळाल्या (१६२ ). वसंतदादांनी आपल्या मनाविरूढ प्रभा राव यांना प्रदेशाध्यक्षपदी नेमल्याने राजीनामा दिला . त्यावेळी महारष्ट्रात वसंतदादा गटाचे शिवाजी पाटील निलंगेकर मुख्यमंत्री झाले. पण वर्षभरात मुलीचा एक गुण वाढीचा कलंक लागला व त्यांना देखील राजीनामा द्यावा लागला (मार्च १९८६). त्यांच्या नंतर पुन्हा शंकरराव चव्हाण मुख्य मंत्री झाले ते जून १९८८ पर्यंत पदावर राहिले . १९७५ ते १९८८ या काळात महाराष्ट्राने ८ मुख्यमंत्री पहिले. या काळात 14 वर्षात वसंतदादा ४३ महिने तर शंकरराव चव्हाण ५३ महिने पदावर राहिले .१९८३ ते १९८५ मधील सव्वादोन वर्षाची कारकीर्द विक्रमी ठरली. १९७५ नंतर २०१४ पर्यंत कोणताच मुख्यमंत्री पाच वर्ष पदावर राहू शकला नाही हि महाराष्ट्राची खरी शोकांतिका आहे. पवार दुसऱ्यांदा मुख्यमंत्री बनले ते साल होते जून १९८८ कारण १९८६ साली पवारांनी राजीव गांधी यांच्या उपस्थित औरंगाबाद येथे कॉंग्रेस आय मध्ये प्रवेश केला त्यावेळी शंकर चव्हाण मुख्यमंत्री होते , पण ते मराठा नेतांचे पाठबळ नसलेले नेते होते याचा फायदा पवारांनी पक्षातील मराठा नेत्यंचा नेता होण्यासाठी करून घेतला व पवार पक्ष बांधणी साठी लागले ,त्यामुळ त्याचं स्थान व उंची वाढली म्हणूनच त्याना मुख्यमंत्री बनवण्यात आले .

कॉंग्रेसेतर पक्षमहाराष्ट्र हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला असल्याने महाराष्ट्रतील इतर पक्षांना वाढीस येवडा वाव नव्हता . व त्यांच्याकडे तसे सक्षम नेतृत्व देखील उपलब्ध नव्हती असे देखील म्हणता येईल. बिगरकॉंग्रेस पक्षात ऐवढी ताकद नव्हती कि ते राज्यातील सत्ता परिवर्तन करू शकतील . त्यांचा पक्ष विस्तार आणि कार्यकर्तेनची संख्या फारच तोकडी होती .कॉंग्रेसला पर्याय म्हून शेतकरी कामगार पक्ष निर्माण झाला , पण फक्त मर्यदित कालवधी पुरताच १९६० ते १९७८ पण शे.का.प स्व:ताचे स्थान निर्माण करू शकला नाही. कारण अनेक महत्त्वाचे नेते कॉंग्रेस मध्ये निघून गेले होते. पण विरोधी पक्ष ऐक्य आणि आणीबाणी मूळ पक्ष पुन्हा जिवंत झाला पु.लो.द सरकारचा घटक म्हणून मंत्रीमंडळत सहभागी त्यावेळी शे.का.प चे 13 आमदार निवडून आले होते. १९७७ पूर्वी जनसंघ आणि समाजवादी पक्ष यांचही महाराष्ट्रात ताकद नगण्य होती . जनसंघाचे ४-५ तर समाजवादी पक्षाचे ८-१० आमदार होते .शहरी भागात या पक्षांचे थोडेफार स्थान होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चळवळीमुळे महाराष्ट्रातील दलित समाज जागृती झाली. पण तिचा राजकीय फायदा उठविणे रिपब्लिकन पक्षला जमले नाही .१९७२ नंतर तरुण कार्यकर्त्यांनी दलित पंथार्स हि लढाऊ संघटना स्थपना केली ,पण फुटीमुळे ती चाली नाही,मराठवाडा विद्यापीठच्या नामांतरासाठी १९७८ पूर्वी रिपब्लिकन पक्षाने कोणतेही राजकीय स्तरवर प्रयत्न केले नव्हते .१९७८ च्या

विधानसभेत रिपब्लिकन पक्षाचे फक्त २ आमदार होते.याच काळात अरुण कांबळे ,रामदास आठवले यांची भारतीय दलित पंथार्स हि संघटना विस्कळीत स्वरुपात अस्तिवात होती. पुढे १९८३ साली प्रकाश आंबेडकर राजकीय कार्यला आरंभ केला .भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थपना केली. हा त्यांचा पक्ष जास्त काही प्रभाव दाखवू शकला नाही. १९७५ सालापासून देशच्या राजकारणचा प्रवाह नव्या दिशने सुरु झाला. त्याच साली सरकारने राष्ट्रीय स्वयं सेवक संघ वरती बंदी घातली होती, त्यामुळे संघाने बिगर कॉंग्रेस पक्षांना एकत्र करून सत्ता स्थापनेत मोलाची कामगिरी घडवून सत्तेत सहभागी झाला. महारष्ट्रात नवहिंदुत्ववाद संघटनाचे प्रास्त वाढले. इतर संघटना मागे पडल्या १९८० साली स्थापन झालेल्या भारतीय जनता पक्ष ने गांधीवादी समाजवाद टाकून देऊन सरळपणे हिंदू राष्ट्रवादचा पुरस्कार केला.१९८४ साली रामजन्म भूमी मुद्यावरून आंदोलनाने वेग घेतल्यावर हे हिंदुत्ववादी राजकारण सुरळीत पणे सुरु झाले. महाराष्ट्रातील नवहिंदुत्ववादी संघटना मागे पडण्याचे कारण म्हणजे शिवसेनेने उचलेले हिंदुत्वाचे शिवधनुष्य.

१९६६ पासून अस्तिवात आलेली शिवसेना मुंबई-ठाण्या बाहेर नगण्यच होती. बाळ ठाकरे यांची भूमिका मुस्लीम विरोधाची होती,पण शिवसेना पुडे आली ती मराठी माणसांचे हितरक्षण करणारी दक्षिणत्याविरोधी संघटना म्हणून . १९७५ ते १९८३ या काळात सेनेचा मागमूसही नव्हता. १९८४ सालच्या भिवंडी येथील दंगली नंतर सेनेची लोकप्रियता वाढली. सेना- भाजप ला हिंदुत्व ग्रामीण भागात पोहचवण्यात यश आले. महारष्ट्रात कॉंग्रेसची पडझड चालू झाली असताना नवीन शक्तींना मिळाला, त्यामध्ये आघाडीवर होत्या त्या शेतकरी चळवळी. शेतकरी जाती कॉंग्रेच्या कणा होत्या , कॉंग्रेसने त्यांच्याकड दुर्लक्ष केल त्यामुळ त्या संघटना वेगळया झाल्या. १९७८ साली शेतकरी शरद जोशी यांच्या नेतृत्वा खाली कांदा आंदोलन उभे केले (१९७९-८०) पुणे व नाशिक जिल्ह्यात हे आंदोलन झाले पोलीस गोळीबार व सरकारने हमी भावाने कांदा खरेदी करण्यचे मान्य केले त्यामुळ शेतकरी संघटनाची लोकप्रियता वाढली. १९६० नंतरच्या बहुजनसमाजवादी भूमिका यामुळे दीर्घकाळ महाराष्ट्रात मागसलेल्या जातींचे राजकरण अस्तिवात नव्हते. १९७० नंतर प्रबळ जातीचे नेते दूर सारण्यचे धोरण म्हणून इंदिरा गांधीनी डावपेचातून

मराठा बिगरमराठा अशा फुटीचा पाया घातला .महारष्ट्रात शिक्षण,सवलती ,वस्तीग्रह या प्रश्नांच्या निमिताने ‘मागास समाज संघर्ष समिती’ स्थपना झाली (१९७८) शरद पवारांच्या पुलोद सरकार बरखस्त झाले यातून काहीच निष्कर्ष निघाला नाही. १९८० साली मंडळ आयोगचा अहवाल आल्यानंतर पुन्हा एकदा मागास वर्ग संघटना सक्रीय झाल्या. १९८३ पासून ‘मंडल आयोग आयोग कृती समिती’ आणि राष्ट्रीय मागास वर्ग महासंघ’ यांच्या मार्फत हे प्रयत्न सुरु झाले. या प्रयत्नांना जनता पक्ष,शे.का.पक्ष,भारतीय जनता पक्ष तसेच कॉंग्रेस (एस) यांचा पाठींबा होता. १९८९ साली तिकीट वाटप मुद्यावरून महाराष्ट्र कॉंग्रेस मध्ये अनेक गट पडले .विदर्भात मोठ्या प्रमणावर बंडखोरी झाली. इंदिरानिष्ठ विदर्भ कॉंग्रेस, मराठवड्यात रायभान जाधवांनी समांतर कॉंग्रेस घोषणा केली. महारष्ट्र इंदिरा कॉंग्रेस नावचा पक्ष उदयाला आला. कॉंग्रेस पक्षाने नवीन स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षा सोबत युती करायचे ठरवले, 13 जागा रिपब्लिकन पक्षाला दिल्या. २७६ जागा स्व:त कॉंग्रेसने लढवल्या. रिप 12,शिवसेना 183 ,भाजप 104,पुलोआ 213 जागा लढवत होते.

1990 साली विधानसभा निवडणूक निकाल तक्ता

| पक्ष | लढवलेल्या जागा | मिळवलेल्या जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| कॉंग्रेस | 276 | 141 | 39.17 |

प्रा.कोकरे संतोष संजय

| | | | |
|---|---|---|---|
| शिवसेना | 183 | 52 | 16.27 |
| भाजप | 104 | 42 | 10.80 |
| जनता दल | 213 | 24 | 13.11 |
| शेकाप | 40 | 8 | 2.35 |
| भाकप | 16 | 2 | 0.84 |
| माकप | 12 | 3 | 0.77 |
| कॉंग्रेस एस | 73 | 1 | 098 |
| भारीप खो | 19 | 1 | 0.54 |
| लोकदल ब | 29 | - | 0.03 |
| जनता पक्ष | 10 | - | 0.01 |
| अपक्ष | 2789 | 14 | 15.13 |

कॉंग्रेसला अपेक्षे प्रमाणे यश भेटल नाही पण 217 जागा दुसऱ्या क्रमांकची मते होती. या यशात शरद पवारांचा मोठा वाटा होता . तरी शहरी भागात हिंदुवादी पक्षला चांगली मते मिळाली होती. भाजप सेना युती ने 94 जागा जिंकून प्रथम प्रबळ विरोधी पक्ष नेता पद मिळवले होते, या नंतर आज 2019 पर्यंत कोंग्रेस पुरेश्या जागा व बहुमत कधीच मिळवू शकली नाही हे नोंद करण्याची बाब आहे .

खऱ्या अर्थाने शुद्ध बिगर कोंग्रेसी सरकार 1995 साली भाजप सेना युती च्या माध्यमातून सर्व प्रथम महाराष्ट्राने पहिले. याला तत्कालीन कारण करणीभूत होते , ते 1994 मध्ये झालेले गोवारी 126 मोर्चेकरी पोलिस लाठीबारत ठार झाले. या लोकांच्या पाठीशी भाजप ठाम पाने उभा राहिला. मुंढे हे राज्यस्तरीय नेता म्हणून उदयास आले . याच काळात भाजप ने भ्रष्टचार व गुन्हेगारी यावर खूप आवाज उठवला.याच काळात (1992)शिवसेना चे छगन भूजबळ 18 आमदार घेऊन बाहेर पडले.त्यातील तीन सेनेत परत आले, बाळासाहेब यांनी सेना पक्ष प्रमुख पद त्याग करयचा निर्णय घेतला पुढे 1993 साली मागे घेतला.याचा परिणाम कॉंग्रेसला 1995 ला सत्ता गवमावी लागली, हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे सतांत्तर होते. मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले ते चार वर्ष पदावर राहिले त्यांनंतर नारायण राणे शेवटी एका वर्षसाठी मुख्यमंत्री झाले त्यांच्या सोबत गोपीनाथ मुंढे हे उपमुख्यमंत्री होते . जुन 1999 साली सोनिया गांधीच्या परदेशी मुद्द्यवरून पवारांनी कॉंग्रेस सोडून आपला राष्ट्रवादी कोंग्रेस नावचा पक्ष स्थापन केला. सप्टेंबर 1999 सालच्या निवडणुकीत कॉंग्रेस ला 75 जागा तर भाजप सेना युतीला 125 जागा (69+56=125) आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस ला 58 जागा मिळाल्या. त्रिशंकु अवस्था निर्माण झाली होती. सेना युती मुख्यमंत्री पदावरून वाद याच सूंनधीचा फायदा घेत पवारांनी कोंग्रेस सोबत आघाडी स्थापन करून सरकार स्थापन केले यामुळ सत्ता कॉंग्रेस कड पण सत्तेत आता भागेदारी होती राष्ट्रवादीची त्यावेळी उपमुख्यमंत्री बनले छगन भुजबळ. विलासरावना काही राजकीय हस्तक्षेपा मुळे राजीनामा द्यावा लागला 2003 साली त्यानंतर सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री झाले पण त्यांनी 2004 सालापर्यंत. 2004 ओक्टोंबार ते डिसेंबर 2008. त्यानंतर अशोक चव्हाण मुख्यमंत्री झाले ते नोव्हेंबर 2010 पर्यंत होते आदर्श घोटळा प्रकरणी राजीनामा द्यावा लागला. पुढे केंद्रातील नेतृतव करणार महाराष्ट्रचे नेते पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री झाले राष्ट्रवादी कॉंग्रेस व पृथ्वीराज चव्हाण वाद संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे याच वादात 2014 नंतर ठिणगी पडली ती केंद्रातील सत्ता बदल झाला मोदीलाटेत सर्वांचा धुरळा उडाला होता राज्यात संयुक्त आघाडी अशी शक्यता नव्हती , आशात 2014 औगस्ट मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पाठींबा काढून घेतला व पृथ्वीराज चव्हाण सरकार कोसले. 2014 युतीत बिघाडी होऊन भाजप व सेना वेगळे लढले त्याच सोबत कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस देखील वेगळे लढले मनसे देखील वेगळी होती. यात भाजप सगळयात मोठा पक्ष म्हणून पुढे आला

1995 नंतर भाजप सत्तेत आला पण येताना येवढ सोप नव्हते भाजप फ्कत 122 जागा होत्या सेना भाजप आधीच बिनसलं असल्याने युती होण शक्य नव्हतं अश्या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस भाजप ला बाहेरून पाठिंबा दिला सत्ता स्थापने नंतर काही दिवसांनंतर राष्ट्रीय स्व्यं सेवक संघाने मध्यस्थी करून सेना भाजप युती घडवून आणले यात भाजपचा प्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणून लाभले . याच सरकार पाच वर्ष पूर्ण करू शकले 1978 नंतर पाच वर्ष पुरे करू शकणारे ते पहिले मुख्यमंत्री ठरले. 2019 विधानसभा निवडणुकीत युती झाली व कॉंग्रेस राष्ट्रवादीची आघाडी पण स्थापन झाली. 2019 निकाल पुढील प्रमाणे

| पक्ष | मिळालेयल्या जागा |
|---|---|
| भाजप | 106 |
| कॉंग्रेस | 44 |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस | 54 |
| शिवसेना | 56 |
| मनसे +रासप+इतर+अपक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस | 78 |

यात युतीला बहुमत मिळाले पण निवडणुकीनंतर मुख्यमंत्री पदावरून वाद निर्माण होऊन युती तुटली, त्यावेळी अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांचे पाहटचे सरकार गमंतीचे विषय बनून 2 दिवसाच्या आता कोसळले. त्यानंतर एकत्र तिन्ही पक्षाचे सरकार महाविकासाघाडी म्हणून नवीन सरकार उदयास आले राज्यात प्रथमच राष्ट्रवादी कॉंग्रेस+कॉंग्रेस+शिवसेना एकत्र आले यात उद्धव ठाकरे महाराष्ट्रचे मुख्यमंत्री बनले तर अजित पवार उपमुख्यमंत्री बनले. या सरकारवर खूप टीका झाली तीन चाकी रिक्षा म्हणून देखील हिणवले गेले.

***सतांत्तर निवडणुका चे दुष्परिणाम ;***

*सतांत्तर होण इतकी सोपी गोष्ट नसते, कितेकवेळया हजरो लोकांना जीवाला तर कोणाला रोजी रोटीला मुखावे लागते,* सतांत्तर होताना आमदार फोडफोडीचे राजकारण मोठ्या प्रमाणवर चालते, अलिकड नवीन ट्रेंड आले हॉटेल राजकारण यामध्ये एखद्या पक्षाचे आमदार फोडून ज्या राज्यात आपले सरकार आहे त्या ठिकाणी इतर पक्षाचे आमदर फोडून लपव्याचे नंतर ते सरकार कोसळले की पुन्हापोटनिवड्णूका लावच्या त्या नाही जमल्या टीआर थेट विधान सभा भंग नव्याने निवडणुका घ्याच्या यामध्ये कोट्यवधी रुपये खर्च होतात जनतेला विनाकारण निवडणुकाचा जनतेच्या कररूपी पैशचा चुरडा केला जातो. तेवढ्च होऊन भागत नाही या निवडणूक कामात शासनाचे काम ठप्प होते आचार संहिता नावाखाली सर्व योजना विकास कामे थांबवली जातात. शिक्षकांना निवडणूक कामात जुंपले जाते त्यामुळं मुलांचं शिकवण सोडून त्यांना या प्रकियेत सहभागी व्हावं लागते. काही सतांत्तर खूप भयंकर वादळी रूप घेतात काही ठिकाणी दंगल जाळ पोळ घटना घडतात यात विनाकारण गरीब लोकांची दुकाने वाहने जाळली जातात. तर काही लोकांना आपल्या प्राणला मुखावे लागते. सतांत्तर झाले की चालू योजना बंद पडतात त्या योजना पुन्हा कधी चालू होतील सांगणे कठीण होऊन बसते, कारण आपल्या सत्ता बदल झाला की जुन्या सरकारचे काम बंद करण्याची अघोषित परंपराच पडली आहे.त्यामुळं चालू झालेले प्रकल्प मधेच अडकून धूल खात पडतात मग जनतेला तो प्रकल्प कधी न कधी चालू होइल या आशेवर काही वर्षे वाट बघावी लागते. सतांत्तर होताना अनेक वेळा कोट्यवधी रूपयेंचा काळाबाजार व घोडेबाजार घडून येतो. निवडुकीला आचनक सामोरे जावे लागल्याने जनजीवन विस्कळीत होते, शेअर बाजार कोसळतो.

**उपाय योजना:**

पक्षांतर बंदी कायदा 1985 52 घटना दुरूस्ती व 10 सूची मध्ये बदल करण्यात आला यानुसार 1/3 येवढे सदस्य दुसऱ्या पक्षात गेले तर याला पक्षांतर म्हणता येणार अशी आट होती. त्यामुळं घटना तज्ञना वाटले पक्षांतर होणार तरि देखील लोक पक्षांतर करू लागले यामुळ पुढे अनेक सरकार कोसळली म्हणून 91वी घटना दुरूस्ती करून पक्षांतर रोखण्यास सरकारने प्रयत्न केले यानुसार 2/3 सदस्यांनी पक्षांतर केले तर ते आपत्र ठरणार नव्हते. पण येवढे करून देखील अनेक पक्षातील लोक राजीनामे देऊन सरकार पडतात व ते पुन्हा निवडून देखील येतात अशी सतांत्तर रोखण्यसाठी एकदा विश्वास प्रस्ताव जिंकल्यानंतर दोन वर्ष अविश्वास सतांत्तर न प्रस्ताव मांडण्याची तरतूद करण्यात यावी. आणि एकदा अविश्वास हरल्यानंतर पुन्हा तो दोन वर्षानी मांडण्यात यावा या तरतुदीमुळ सरकार स्थिर राहतील. जे नेते पक्षांतर करतात त्यांना कमीत कमी तीन वर्ष मंत्री अथवा कोणत्या महामंडलवर नेमू नये. यामुळ पक्षांतर प्रमाण कमी होइल तसेच सरकार पडण्याची प्रमाण कमी राहील.वारंवार होणाऱ्या मध्यवधी निवणुका टाळया जातील. एकदा निवडून आल्यानंतर त्या सदस्याने पाच वर्षात राजीनामा देऊ नये अशी तरतूद करावी. तसेच लोकांनी या दल बदलू नेत्यना निवडणुकीत चांगला धडा शिकवावा. आणि दीर्घकाळ टिकणारे विकसभिमुख शासन स्थापन व्हावे हीच एक अपेक्षा...

**संदर्भ**

1. महाराष्ट्रातील सतांत्तर : राजेंद्र व्होरा ,सुहास पळशीकर
2. महाराष्ट्रातील राजकारण नव्या वळणावर
3. 2014 व 2019 निवडणूक अहवाल

प्रा.कोकरे संतोष संजय